"विधी अधिकारी" या गट-ब या पदाचे सेवाप्रवेश नियम प्रसिध्द करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: विधीअ ४१०४/(१९१/०४)/प्रशा-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ एप्रिल, २००७.

**शासन निर्णय** :- सोबत जोडण्यात आलेली अधिसूचना (इंग्रजी व मराठी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी व त्याच्या ५० प्रती या विभागाकडे तसेच खाली कंसात दर्शविल्याप्रमाणे संबंधितांना वितरित कराव्यात.

२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ही अधिसूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी.

३. सदर अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली असुन त्याचा संगणक सांकेतांक २००७०४२४१२०२४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि. सु. बेर्डेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

व्यवस्थापक, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, मुंबई.
प्रत, शिक्षण संचालक (माध्यृव उच्चमाध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे. (५० प्रती)
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे. (१० प्रती)
शिक्षण संचालक (प्रौढ), महाराष्ट्र राज्य, पुणे. (१० प्रती)
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (१० प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उपसचांलक (प्रत्येकी ५० प्रती)
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
विधी व न्याय विभाग, मंत्रलाय, मुंबई.
सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / सर्व कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, प्रशा-५.

# अधिसूचना

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ एप्रिल,२००७

भारताचे संविधान

क्रमांक विधीअ-४१०४/(१९१/२००४)/प्रशा-५: भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याव्दारे महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील विधी अधिकारी, गट-ब या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे नियम खालीलप्रमाणे करीत आहेत :-

१) या नियमांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातील विधी अधिकारी, गट-ब या पदाचे (सेवा प्रवेश) नियम, २००७ असे संबोधण्यात यावे.

२) या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, ---

अ) "सहाय्यक (विधी)" म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी शाखेतील सहाय्यक ;

ब) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

क) "पदवी" म्हणजे सांविधिक विद्यापीठाची पदवी ;

ड) "विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ;

इ) "संचालनालय " म्हणजे शासनाचे शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.

ई) " शासन "म्हणजे महाराष्ट्र शासन ;

उ) " विभागीय शिक्षण उपसंचालक " म्हणजे शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करणारे विभागीय शिक्षण उपसंचालक

३) संचालनालयातील विधी अधिकारी, गट - ब या पदावरील नेमणूका पुढील मार्गाने करता येतील,--

(अ) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने, --

(एक) ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नाही :

परन्तु अगोदरच शासन सेवेत असलेल्या उमेदवारांच्या प्रकरणी कमाल वयोमर्यादा १२ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील ;

(दोन) ज्यांनी विधी शाखेची पदवी धारण केली असेल ;

(तीन) ज्यांनी सहाय्यक (विधी) या पदावर ५ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी काम केले असेल ; किंवा

( तीन) जी व्यक्ती उच्च न्यायालय अथवा त्याखालील दुय्यम न्यायालयामध्ये ५ वर्षापेक्षा कमी नाही, इतक्या कालावधीसाठी विधी व्यवसाय करीत असेल ; किंवा

( तीन) शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही कार्यालयात कार्यरत असलेली आणि ५ वर्षापोक्षा कमी नाही इतक्या कालावधीची न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव असेल, अशी विधी शाखेची पदवी धारण केलेली व्यक्ति.

(ब) शासन अथवा अन्य स्थानिक प्राधिकरण यांच्या सेवेत असलेल्या आणि या नियमाच्या खंड (अ) च्या उपखंड (दोन) व (तीन) मधील अर्हता धारण करीत असलेल्या व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीने.

४) नामनिर्देशनाने पदावर नेमणूक झालेली व्यक्ती २ वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहील. परिविक्षा कालावधीजास्तीत जास्त १ वर्षापर्यंत वाढ करता येईल.

पदावर नेमणूक केलेल्या व्यक्तीला, पदासाठी विहित केली असेल ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होऊन परिविक्षा विहित कालावधीत यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने/तीने विहित कालावधीत, विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा परिविक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही किंवा तो/ती पदाला अपात्र आढळून आले तर पूर्वसूचनेशिवाय सेवा समाप्त करण्यास तो/ती पात्र ठरेल.

५) पदावर नेमणूक दिलेल्या व्यक्तीस शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६) या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीस,जर अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्या संबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

७) पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

आनंद कुलकर्णी

( आनंद भी. कुलकर्णी )

शासनाचे प्रधान सचिव

## NOTIFICATION

School Education and Sports Department,
Mantralaya, annexe, Mumbai 400 032

Dated 2 1 April, 2007

Constitution of India.

No. LAO – 4104 / ( 191 / 2004 ) / Adm-5 In excercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules for regulating recruitment to the post of Law Officer, Group-B in the Directorate of Education (Secondary and Higher Secondary Education) of the School Education and Sports Department of Government of Maharashtra, namely :-

1. These rules may be called the Law Officer, Group-B in the Directorate of Education, (Secondary and Higher Secondary Education) of the School Education and Sports Department (Recruitment ) Rules, 2007.

2. In these rules, unless the context requires otherwise ,

   a) 'Assistant (Legal)' means the Assistant of the legal side of the Law and Judiciary Department of Government of Maharashtra ;

   b) 'Commission' means the Maharashtra Public Service Commission ;

   c) 'Degree' means the degree of a statutory university;

   d) 'Department' means the School Education and Sports department of the Government of Maharashtra;

   e) 'Directorate' means the Directorate of Education (Secondary and Higher Secondary Education); Maharashtra State, Pune

   f) 'Government' means the Government of Maharashtra;

g) 'Regional Deputy Director of Education' means Regional Deputy Directors of Education, working under the administrative control of Director of Education (Secondary and Higher Secondary Education) Maharashtra State, Pune

3. Appointment to the post of Law Officer, Group-B, in the Directorate shall be made either -

(a) by nomination from amongst the candidates who –

(i) are not more than 33 years of age;
provided that, the age limit may be relaxed upto 12 years in case of the candidates already in the service of the Government.

(ii) Possess a degree in Law ;

(iii) Are holding or have held the post of Assistant (Legal) for a period of not less than 5 years; or

(iii) Possess a degree in Law and having experience as an Advocate in the High Court or Courts subordinate thereto for a period of not less than 5 years; or

(iii) Are working in any of the offices of the Government and having experience of operating legal matters for a period of not less than 5 years, with degree in Law

(b) by deputation of a person in the service of the Government or any local authority and who possess the qualifications mentioned in sub-clauses (ii) and (iii) of clause (a) of this rule.

4. A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of 2 years and probation period may be extended maximum upto one year only. Person appointed to the post shall be required to pass such departmental examination that may be prescribed for the post and complete the probation successfully within prescribed period. If he/she does not pass the prescribed departmental examination or does not complete the probation period successfully shall be liable to be terminated without prior notice.

5. A person appointed to the post should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology of Government.

6. A person appointed to the post shall be required to pass the Examination in Hindi and Marathi, according to the rules made in that behalf unless he has already passed, or has been exempted from passing the same.

7. A person appointed to the post shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Anand B. Kulkarni

(Anand B. Kulkarni)

principal Secretary to Government.